राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शालेय,महिला, ग्रामीण व इतर क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्ती करिता निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
शासन निर्णय क्रमांक : क्रीडायो १६१९/प्र.क्र. ८५/क्रीयुसे -२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई-४०० ०३२
तारीख : २३ ऑगस्ट, २०१९

वाचा

१. शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, शासन निर्णय क्रमांक राक्रीधो २०१२ /प्र.क्र.१४५ /१२/ क्रीयुसे - २, दि.०४.०७.२०१३.
२. वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१९/प्र.क्र.९२/अर्थ-३, दि.०८.०७.२०१९.
३. क्रीडा व युवक सेवा पुणे यांचे पत्र क्रमांक.क्रीयुसे /क्रीडानैशि /निवि /२०१९-२०/६/ का-४/१३९४,दि.१७.०७.२०१९

प्रस्तावना -

राज्यात तालुका ते राष्ट्रीय स्तरावर भारतीय शालेय खेळ महासंघ यांच्या वतीने शालेय क्रीडा स्पर्धा, तसेच भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या महिला व ग्रामीण (पायका) क्रीडा स्पर्धा यांचे आयोजन क्रीडा व युवक सेवा संचालनालयद्वारे करण्यात येते. उपरोक्त संदर्भाधीन क्र.३ च्या पत्रान्वये सन २०१९-२० या वर्षातील सहभागी व प्राविण्य प्राप्त खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्याकरीता निधी वितरीत करण्याचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला होता. त्या अनुषंगाने या योजनेत सन २०१९-२० मध्ये अनुदानाच्या वितरणास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

सन २०१९-२० या वर्षाकरीता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय शालेय,महिला,ग्रामीण व इतर क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्ती देण्याकरिता एकूण ₹.३००.०० लक्ष निधी अर्थसंकल्पित आहे. त्यापैकी सहभागी तसेच प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शिष्यवृत्ती देण्याकरिता रु.१८०.००लक्ष (रुपये एक कोटी ऐंशी लाख फक्त) इतकी तरतूद वितरित करण्यास व सदर रक्कम आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांच्या अधिनस्त ठेवण्यास याद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त संदर्भात होणारा खर्च "मागणी क्रमांक: ई-३, २२०४- क्रीडा व युवक सेवा १०४ क्रीडा व खेळ (०९) खेळाडूंना शिष्यवृत्त्या व पुरस्कार (०९) (०१) क्रीडा नैपुण्य शिष्यवृत्त्या (२२०४-१६६७) ३४ शिष्यवृत्त्या/विद्यावेतने” या लेखाशिर्षाखालील चालू वित्तीय वर्षामध्ये मंजूर तरतूदीमधून भागविण्यात यावा. सदरचे अनुदान ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आले आहेत त्याच प्रयोजनासाठी खर्च करण्यात यावे.

I. उपरोक्त निधी आवश्यकतेनुसार मान्य निकषानुसार खर्च करण्यात यावा. ज्यावेळेस निधी प्रत्यक्ष खर्च करावयाचा त्याच वेळी आंहरीत करावा. शासन लेख्याबाहेर बँक खात्यात हा निधी ठेऊ नये.

II. राज्य शासनामार्फत वेळोवेळी वित्त विषयक निर्गमित करण्यात आलेले विविध आदेश/नियम/ शासन निर्णय वित्तीय नियमावली यांची अंमलबजावणी करुन वरील वितरीत तरतूदीचा विनियोग करण्याच्या अधीन राहून उपरोक्त तरतूद वितरीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

३. सदर योजनेअंतर्गत खेळाडूंना शिष्यवृत्ती मंजूर करतांना संदर्भाधीन क्र.१ च्या शासन निर्णयामधील परिच्छेद क्र.३ मधील अटी व शर्ती लागू राहतील.

४. वित्त विभाग दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनानुसार उपरोक्त तरतुद खर्च करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी. यासाठी संबंधीत जिल्हा क्रीडा अधिकारी यांना आंहरण व संवितरण अधिकारी तर आयुक्त, क्रीडा व युवक सेवा यांना नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक ०८.०७.२०१९ च्या परिपत्रकातील सूचनांना अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१७१४५२१११४२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajendra Shankarrao Pawar

Digitally signed by Rajendra Shankarrao Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education and Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=679184b88f7019ef64ad6ddc2495ca280267c0d4755ce63fa70c45cf755d9373, cn=Rajendra Shankarrao Pawar
Date: 2019.09.17 15:03:13 +05'30'

(राजेंद्र पवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१.मा.राज्यपाल तथा अध्यक्ष, आंतरविद्यापीठ क्रीडा महोत्सव आयोजन समिती, मुंबई.
२.मा.मंत्री, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३.मा.विरोधी पक्षनेता (विधानसभा / विधानपरिषद) यांचे स्वीय सहायक, मुंबई.
४. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य यांचे स्वीय सहायक.
५. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
६. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे,
७. महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर,
८. महालेखापाल (लेखा), महाराष्ट्र-१ - मुंबई/महाराष्ट्र-२ नागपूर
९. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१०. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत)

११. वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे. (क्रीडा संचालनालयामार्फत)
१२. लेखाधिकारी, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे, (क्रीडा संचालनालयामार्फत)
१३. सर्व उपसंचालक व जिल्हा क्रीडा अधिकारी (क्रीडा संचालनालयामार्फत),
१४. वित्त विभाग (व्यय-५)/अर्थ-८/नियोजन विभाग (का.१४७१), मंत्रालय, मुंबई,
१५. कार्यासन अर्थसंकल्प, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती (क्रीयुसे-२)